शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर!! विश्वासाची परंपरा!!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी. रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड.
संपर्क : ०२३०३७७, मो. ८४३२७७१७७७
शाखा : माळीवेस, बीड
संपर्क : ०२२०३७७, मो. ९४०५०७२७७७

जनसामान्यांचे शस्त्र, दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

।। श्री गंगाभारती कृपा ।। 7038389999
आपल्या आवडीचा बेड आपल्या बजेटमध्ये
ऑफर 10000 खरेदीवर १५% डिस्काऊंट
आदित्य फर्निचर मॉल
आजच बुक करा... आपल्या स्वप्नातील बेड...
सोमेश्वर मंदिरासमोर, बार्शी रोड, बीड

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १६९ ● शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ● पाने ४ ●किंमत ३ रूपये

बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ●https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# विधानसभेसाठी भाजपचा वरचष्मा ?

## अमित शाह यांचा फॉर्म्युला शिंदे-दादा गटाला मान्य? काय झाली रात्री खलबतं

**मुंबई । प्रतिनिधी**

महायुतीत जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरल्याचा दावा सूत्र करत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नागपूरसह छत्रपती संभाजीनगरमध्ये कार्यकर्त्यांशी संवाद साधला. भाजप विदर्भासह मराठवाड्यातील विधानसभेच्या जागा जिंकण्यासाठी भाजपने म ायक्रो प्लॅनिंग केले आहे.

लोकसभेतील विधानसभानिहाय कामगिरीची समीक्षा केल्यानंतर पक्ष सुक्ष्म नियोजनावर भर देत आहे. त्यातच आता जागा वाटपात पण भाजपचा वरचष्मा असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे मित्र पक्षांच्या झोळीत ज्या जागा येतील त्यात अपक्षांसाठी मित्र पक्षांनाच मन मोठं करावं लागणार आहे. तर भाजपही त्याच्या कोट्यातील काही जागा छोट्या पक्षांसाठी सोडणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. याविषयीची अधिकृत आकडेवारी जाहीर झाल्यावर चित्र समोर येईल.

**▸ १५५ जागांवर भाजपचा दावा**

छत्रपती संभाजीनगर येथे रात्री उशीरापर्यंत जागा वाटपासाठी खलबतं करण्यात आली. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित होते. या बैठकीत भाजपने १५५-१६० जागा लढवाव्यात आणि उर्वरीत जागा मित्रपक्षांनी लढवाव्यात अशी रणनीती आखल्याची माहिती समोर येत आहे. भाजप कोणत्याही परिस्थितीत १५० पेक्षा कमी जागांवर लढणार नसल्याचे पण बैठकीत स्पष्ट करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. भाजप जवळपास १५५ जागा लढणार असल्याचे या बैठकीतील सूर होता. त्यामुळे जागा वाटपात भाजपचा वरचष्मा दिसला. त्यावर मित्रपक्षांची प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

**▸ मित्रपक्षांच्या पारड्यात जागा किती ?**

भाजपने १५५ जागावर दावा केल्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार गटाच्या वाट्याला १३३ जागा येतील.

### थोडक्यात

## बीड आयटीआय ला लोकनेते विनायकराव मेटे यांचे नाव

## लोकनेत्याच्या कार्याचा मरणोत्तर गौरव : प्रभाकर कोलंगडे

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते विनायकराव मेटे यांच्या प्रथम जयंती निमित्त दी. ३० जून २०२३ रोजी बीड येथेल आयोजित कार्यक्रमात राज्याचे मा. उपमुख्यमंत्री यांनी आपल्या भाषणात बीड येथील आयटीआय ला लोकनेते विनायकराव मेटे यांचे नाव देण्याचे जाहीर घोषणा केली होती. या घोषणेची पूर्तता दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत करण्यात आली. त्यामुळे लोकनेते विनायकराव मेटे यांचे चाहते आणि शिवसंग्राम चे समस्त पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण आहे. लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी त्यांच्या हयातीत अनेक गोरगरीब दिन दुबळ्या आणि वंचितांसाठी शिवसंग्राम संघटनेच्या माध्यमातून काम केले मराठा सम ाजाकरिता आरक्षण आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक या गोष्टींचा पाठपुरावा साहेबांनी त्यांच्या अंतिम श्वासापर्यंत केला. त्याचबरोबर एमपीएसई विद्यार्थांसाठी जेवणाची मोफत व्यवस्था त्यांची वयोमर्यादा वाढवणे , पोलीस भरतीची वयोमर्यादा वाढवणे, विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून देणे यासारखे अनेक कामे त्यांनी विद्यार्थांसाठी केले आज बीड येथील शासकीय आयटीआय ला त्यांचे नाव दिल्याने जो पर्यंत हे महाविद्यालय आहे तो पर्यंत लोकनेते विनायकराव मेटे यांचे नाव अजर अमर राहणार आहे. याचा मनस्वी आनंद सर्व लोकनेते विनायकराव मेटे साहेबांवर प्रेम करणाऱ्या त्यांच्या चाहत्यांना आणि शिवसंग्राम च्या मावळ्यांना झाला आहे. असे मत शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे यांनी व्यक्त केले आहे.

## वंचितचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी भोले, बंटी सौंदरमल, सरपंच धोंडिराम डिंगरे राष्ट्रवादीत दाखल ; अमरसिंह पंडित यांनी केले राष्ट्रवादीत स्वागत

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे खामगाव येथील भाजपाचे सरपंच धोंडिराम डिंगरे यांच्यासह गेवराई येथील वंचित बहुजन आघाडीचे युवक तालुकाध्यक्ष बंटी सौंदरमल आणि वंचित बहुजन आघाडीचे युवक जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी भोले यांनी त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजितदादा गटात जाहीर प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे स्वागत केले. गेवराई तालुक्यातील मौजे खामगाव येथील भाजपा-सेनेचे सरपंच धोंडीराम डिंगरे, उपसरपंच गौतम वारे, ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल साके, बबन वाघ, अशोक भोसले, प्रदिप आव्हाड, माजी सरपंच भाऊसाहेब वारे, किसन वाघ, मच्छिंद्र माने, जयदीप आव्हाड आदींनी माजी आम दार तथा राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित आणि जि.प.चे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय करत अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी तंटा मुक्तीचे अध्यक्ष बाळासाहेब खेडकर, मुक्तराम आव्हाड, सोमनाथ गिरगे, भैय्यासाहेब जऱ्हाड, संदिप आव्हाड, प्रदिप मोरे, शरद बारहत्ते, विकास आव्हाड आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. गेवराई येथील वंचित बहुजन आघाडीचे युवक तालुकाध्यक्ष बंटी सौंदरमल आणि वंचित बहुजन आघाडीचे युवक जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी भोले यांनी अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी त्यांचे राष्ट्रवादीत स्वागत केले. यावेळी धमपाल भोले, दिनेश घोडके आणि संतोष शेजुळ उपस्थित होते.

## कर्णकर्कश सायलंसर वर बीड पोलिसांची कारवाई ; १ लाख ३० हजाराचा दंड वसूल

**बीड । प्रतिनिधी**

वाहनधारकांच्या कर्णकर्कश सायलंसरच्या आवाजाने अंबाजोगाई शहरातील नागरीक त्रास झाले होते याबाबत प्रसार माध्यमांनी आवाज उठविल्यानंतर बीडचे पोलीस अधीक्षक बारगळ यांच्या आदेशानुसार वाहतूक पोलिसांच्या पथकाने आज गुरुवार दि २६ रोजी सनी५मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत १८० वाहनधारकांवर कारवाई केली असून त्यांच्याकडून १ लाख ३० हजार २००रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. मागील कित्येक महिन्यापासून अंबाजोगाई शहरात कर्णकर्कश हॉर्न, फॅन्सी नंबर प्लेट आणि नवीन युवकांची बुलेट चे सायलंसर याने नागरिक पूर्ण त्रस्त झाले होते. काही हृदय रोगी वयोवृद्ध नागरिकांना रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावे लागले आहेत. सामान्य नागरिकांना होत असलेल्या त्रासामुळे माध्यमांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून आवाज उठविला होता. याची दखल घेत पोलीस अधीक्षक बारगळ यांनी थेट बीड येथील वाहतूक शाखेच्या पथकाला सूचना केल्या नंतर अंबाजोगाई शहर व ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त मोहिमेने २६ बुलेट चे सायलंसर, फॅन्सी नंबर प्लेट व कर्णकर्कश आवाज असणारे हॉर्न असे मिळून १८० वाहनधारकांवर कारवाई करत ▸▸ उर्वरित पान २ वर

## श्रेयवादासाठी शहरातील अक्षरश: चाळण झालेल्या रस्त्यांना मंजुरी दिली नाही !

### पालकमंत्री साहेब बीड शहरातील विकास कामात भेदभाव करू नका: खुर्शीद आलम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत जालना रोड ते अम रधाम स्मशानभूमी (बिंदुसरा नदीवरील पूल) पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण व पक्की नालीबांधकाम करण्यास मंजुरी मिळून या कामाला सुरुवात होणार असल्याचे समजते. हे समजल्यानंतर आनंद झाला. मात्र सोबतच दुःख झाले. दुःख याचे कि, केवळ श्रेयवादासाठी म्हणजे जे काही केलं ते आम्हीच केलं असे दिसावे म्हणून बीड शहरातील अक्षरशः चाळण झालेल्या इतर रस्त्यांना मात्र अनेक प्रयत्न केल्यानंतरही मंजुरी मिळाली नाही.

बीड शहरात विविध ठिकाणी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान राज्यस्तरीय महाअभियान योजनेंतर्गत रस्ता व ▸▸ उर्वरित पान २ वर

## खोटे धनगर प्रमाणपत्र रद्द करून तात्काळ धनगर एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी ; सकल धनगर समाजाची मागणी

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात हजारो वर्षापासून धनगर जमात अस्तित्वात असून या जमातीचा मुख्य व्यवसाय मेंढी पालन हा आहे, मेंढी पालनासाठी डोंगर दर्या खोऱ्यात राहून आपल्या पशुधनाची काळजी घेणारी ही जमात शेकडो वर्षापासून रानावनात भटकत फिरत राहण्यामुळे या महाराष्ट्रातील प्रस्थापित घराण्यांनी या समाजाच्या अस्तित्वाचा प्रश्न गंभीर बनवलेला आहे त्याचे कारण म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेमध्ये धनगरांना आदिवासी जमातीमध्ये समावेश केलेला आहे परंतु धनगर सम ाजाच्या अज्ञानाचा गैरफायदा उचलत महाराष्ट्रातील प्रस्थापित घराण्यांनी शब्दांची रचना बदलून म्हणजेच शब्दांचा खेळ खेळून समाजाच्या भावनांचा राजकीय आर्थिक सामाजिक शैक्षणिक जीवनाचा अक्षरशा खेळ मांडलेला आहे ही जमात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणाऱ्या जमातीमध्ये आदिवासी मध्ये म ोडत आहे परंतु मुद्दामच राजकीय सोडवून देणे या समाजाचा सर्वदृष्ट्या नुकसान करण्याच्या हेतूने समाजाला एन टी सी अशा स्वतंत्र प्रवर्गात ठेवून समाजाचे सर्व प्रकारचे नुकसान करण्याचे या सत्ता दारांचे धोरण असून ७० वर्षापासून एसटी आरक्षणाची अंमलबजावणी साठी अनेक लढे हा समाज लढत असून सरकार या लढ्याकडे दुर्लक्ष करत आहे परंतु सरकारने आता झोपेचे साँग न घेता समाजाला तात्काळ आरक्षणाचा लाभ द्यावा ▸▸ उर्वरित पान २ वर

## देशातील पहिली एअर ट्रेन दिल्लीत सुरू होणार

**नवी दिल्ली**

विकसित भारताचे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने भारताने एक पाऊल पुढे टाकले आहे. भारतातील पहिली एअर ट्रेन येत्या काळात दिल्लीविमानतळावर सुरू होणार आहे. मात्र, तुम्हाला माहित आहे का ?

राजधानी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठ्या विमानतळांपैकी एक आहे. दिल्ली विमानतळावरून दररोज हजारो प्रवासी विमानातून प्रवास करतात. यामध्ये मोठ्या संख्येने आंतरराष्ट्रीय प्रवाशांचा समावेश आहे, ज्यांच्याकडे कनेक्टिंग फ्लाइट असते किंवा जे विमानतळाच्या टर्मिनल १ वर पोहोचतात आणि नंतर टर्मिनल २ किंवा ३ वर जाण्यासाठी रस्तेम ार्गाचा वापर करतात. मात्र आगामी काळात अशा प्रवाशांना एअर ट्रेनम धून एका टर्मिनलवरून दुसऱ्या टर्मिनलवर सहज जाता येणार आहे. एअर ट्रेन सुरू झाल्यास विम ान प्रवासी ट्रॅफिकमध्ये न अडकता काही मिनिटांत टर्मिनल ३ आणि टर्मिनल २ पर्यंत पोहोचू शकतात.

## महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीचं बिगूल वाजणार

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार तसेच निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ.सुखबीर सिंह संधू यांच्या शिष्टमंडळाचे आज रात्री ८ वाजता मुंबई विमानतळावर आगमन झाले.

महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी पी. प्रदीप तसेच मुंबई उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र ▸▸ उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश येथे शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी चक्का जाम आंदोलन ; बैलगाड्यांसह शेतू रस्त्यावर : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान योजनेंतर्गत विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी अडसर असणारी जाचक ई पीक पाहणी अट रद्द करण्यात यावी,अतिवृष्टीमुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी, २५ टक्के अग्रीम पिक विमा तातडीने द्यावा,थकीत पीक कर्जामुळे शेतकऱ्यांच्या बचत खात्याला बँकेने लावलेला होल्ड काढण्यात यावा. मुळुकवाडी -मसेवाडी शिवार रस्त्याची मोजणी फिस भरून दिड वर्ष उलटूनही अद्याप मोजणी करण्यात आली नाही ती तातडीने करण्यात यावी, महावितरणच्या अनागोंदी ▸▸ उर्वरित पान २ वर

### ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा

**बीड जिल्ह्यातील ६१ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची खरीप हंगामातील सोयाबीन, बाजरी ,कापुस ,उडीद, तुर,कांदा,पिकांचे अतोनात नुकसान झाले असुन शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट आर्थिक अनुदान देण्यात यावे.**

## योगेश भैय्या बीड शहराची चाळणी करण्यात तुमचा पन मोठा वाटा

### ३० वर्ष नगर पालिका क्षीरसागरांच्याच ताब्यात होती : सचिन मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना म ुलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. दोन, चार व्यक्तींम ुळे बीडची वाट लागली नसून शहराची चाळणी फक्त आणि फक्त क्षीरसागर कुटुंबियांमुळेच झाली आहे. योगेश भैय्या बीड शहराची चाळणी करण्यात तुमचा पन मोठा वाटा आहे. शहरातील जनतेनेचे ३० वर्षांहून अधिक काळ नगर पालिका क्षीरसागरांच्या एक हाती दिली. मात्र क्षीरसागरांनी जनतेचे उपकार फेडण्याऐवजी एकम ेकांच्या राजकीय स्वार्थासाठी शहरात समस्यांचा डोंगर उभा करुन नागिरकांना वेठीस धरण्याचे पाप केले आहे असल्याचा आरोप शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केला आहे.

जिल्हाप्रमुख मुळूक म्हणाले की, बीड शहरातील काही रस्त्यांची कामे करुन दोन्ही क्षीरसागर विकासाच्या गप्पा मारतात. मात्र आजही शहरातील रहदारी असलेल्या मुख्य रस्त्यांची वाट लागली आहे. गेल्या काही दिवसांपासून बीडमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. या पावसामुळे शहरातील मुख्य रस्त्यावरील दुकानांमध्ये पाणी शिरले. भाजीमंडईतील संस्कार विद्यालयातही पाण्याचा शिरकाव झाला तर काही भागामध्ये पाण्याचे तळे साचले आहे. जालना रोडवर दुकानांमध्ये पाणी शिरले. शहरात प्रत्येक वॉर्डात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून घंटागाड्या कधी येतात तर कधी येत नाही. आठ आठ दिवस वॉर्डांमध्ये घाण साचून दुर्गंधी निम ाण होत आहे. शहरात स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे. गेल्या ३० वर्षांवर बीडची नगर पालिका क्षीरसागरांच्या ताब्यात होती. तेव्हापासून आजतायगत या रस्त्याची अवस्था जैसे थे आहे. शहरातील चार दोन रस्त्यांची कामे करुन विकासाच्या नावाखाली शहराला भकास ▸▸ उर्वरित पान २ वर

## बिहारमध्ये जिउतिया उत्सवादरम्यान बुडून ४३ जणांचा मृत्यू:

# ३७ मुलांचा समावेश; १६ जिल्ह्यांत दुर्घटना, औरंगाबादेत सर्वाधिक ८ मृत्यू

बिहारमध्ये जिउतिया सणादरम्यान नदी आणि तलावात आंघोळ करताना झालेल्या अपघातात आतापर्यंत ४३ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ३७ मुले आणि ६ महिलांचा समावेश आहे. या सर्वांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

२४ आणि २५ सप्टेंबर रोजी हे अपघात झाले. औरंगाबाद जिल्ह्यात सर्वाधिक १० मृत्यू झाले आहेत. येथे दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ८ मुलांचा बुडून मृत्यू झाला.

वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या वृत्तानुसार, मृतांचा आकडा वाढू शकतो. अजूनही अनेक लोक बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये हे अपघात झाले आहेत. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपयांची भरपाई जाहीर केली आहे. प्रथम जिउतिया सणाबद्दल जाणून घ्या... बिहार, झारखंड आणि पूर्व उत्तर प्रदेशातील काही भागात जिउतिया किंवा जीवितपुत्रिका व्रत पाळले जाते. या दिवशी स्त्रिया आपल्या मुलांच्या दीर्घायुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी २४ तास काहीही न खाता-पिता उपवास करतात. यामध्ये भगवान जीमूतवाहन यांची विधीवत पूजा केली जाते. उपवासाच्या दिवशी सकाळी उठून स्नान करून सूर्यदेवाची पूजा केली जाते. गृहमंदिरात एका ताटात सूर्यनारायणाची मूर्ती बसवली जाते. त्यांना दुधाने आंघोळ घातली जाते. देवाला दिवे आणि उदबत्ती अर्पण करून आरती केली जाते.

औरंगाबाद जिल्ह्यात ८ मृत्यू, २ मुली बेपत्ता

औरंगाबाद जिल्ह्यातील बरुण पोलिस ठाण्याच्या हद्दीत ५ अल्पवयीन मुली उपवास करणाऱ्या महिलांसोबत तलावात आंघोळीसाठी गेल्या होत्या. महिला आंघोळ करून जवळच्या मंदिरात पूजा करण्यासाठी गेल्या. मुली आंघोळ करत राहिल्या. दरम्यान, निशा ही किशोरवयीन मुलगी बुडू लागली. तर बहीण अंकुतिला वाचवण्यासाठी गेली. तीही बुडू लागली. दोघींना बुडताना पाहून इतर मुली पुढे सरसावल्या. माहिती मिळताच स्थानिक लोक आले. त्यांना वाचवण्यासाठी तलावात उडी घेतली. तोपर्यंत चार मुलींचा बुडून मृत्यू झाला होता. एक मुलगी राशी कशीतरी वाचली.

दुसरी घटना औरंगाबादमधील मदनपूर येथील कुशाहा गावात घडली. येथेही जिउतियामध्ये स्नान करताना अपघात झाला. महिला बार्ली विणत असताना १८ मुले पाण्यात आंघोळ करू लागली. सगळे बुडू लागले. लोकांनी १४ मुलांना वाचवले, पण ४ जण बुडाले. अहार खोदत असताना एका ठिकाणी खोल खड्डा खणला होता, त्यात तीन मुली आणि एका मुलाचा बुडून मृत्यू झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दोन मुली बेपत्ता आहेत. त्यांचे मृतदेह सापडलेले नाहीत.

# अगोदर उमेदवार जाहीर करा म्हणताच संतापले जयंत पाटील; भाषण सोडून फिरले माघारी, मग पुढं झालं काय?

सध्या महायुती आणि महाविकास आघाडीत चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत. सर्वच पक्ष विधानसभेच्या तयारीला लागले आहेत. जागा वाटपाची खलबतं सुरू आहे. अनेक मतदारसंघात तीनही पक्षांनी दावा केलेला आहे.

त्याठिकाणी उमेदवार ठरलेला नाही, अशी स्थिती असताना जयंत पाटील यांच्यासमोर अहमदनगर जिल्ह्यातील अकोले येथील सभेत मोठा पेचप्रसंग उभा ठाकला. मग काय जयंत पाटील यांचा पारा चढला आणि त्यांनी कार्यकर्त्याला झाप झाप झापून काढले.

अन् जयंत पाटील यांचा पारा चढला

राष्ट्रवादी शिवस्वराज्य यात्रा आज अकोले येथे पोहचली. त्यावेळी मंचावर सर्वच प्रमुख नेते होते. जयंत पाटील हे भाषणासाठी उभे राहताच अकोले विधानसभेसाठी उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्याची मागणी गर्दीतून एका कार्यकर्त्याने केली. भाषणाच्या सुरुवातीलाच उमेदवाराचे नाव जाहीर करण्याची मागणी केल्याने जयंत पाटलांचा संताप झाला. जयंत पाटील भाषण सोडून मागे फिरले. अमित भांगरे, जिल्हाध्यक्ष संदिप वर्पे यांनी विनंती केल्यानंतर जयंत पाटील यांनी भाषणास सुरूवात केली.

मग कार्यकर्त्याला घेतले फैलावर

मी फक्त येथे फक्त उमेदवाराची घोषणा करण्यासाठी आलो नाही, असे पाटील यांनी कार्यकर्त्याला फटकारले. त्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना शिस्त पाळण्याच्या सूचना केल्या. १ तारखेला महाविकास आघाडीच्या जागा वाटपावर शिक्कामोर्तब होणार आहे. आम्हाला आघाडी टिकवायची आहे. त्यामुळे आज उमेदवाराची घोषणा करणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

भाषण सुरू असताना घोषणा देणाऱ्या कार्यकर्त्याला अकोलेचा उमेदवार कोण आहे हे अजूनही कळत नसेल तर त्याच्या बुद्धीची कीव येते, असा खरमरीत टोला त्यांनी लगावला. त्यांनी यावेळी अमित भांगरे यांच्या नावाची घोषणा केलेल्या कार्यकर्त्याला टोला देत नाव न घेता उमेदवारी जाहीर केल्याची चर्चा रंगली. सध्या श्राद्ध पक्ष सुरू आहे. घट बसल्यावर मुहूर्त आहे उमेदवार घोषणा तेव्हाच होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. आपण कुठेच उमेदवार घोषित केला नाही. जामनेरमध्ये एक नवीन नेते भाजपमधून आपल्या पक्षात आले. पण त्यांचंही नाव जाहीर केले नाही. मी फक्त भाषणात सांगितले की, त्यांच्या हातात तुतारी दिलेली आहे. कारण आपण उमेदवाराची घोषणा करु शकत नाही, असे ते म्हणाले.

## पान ४ वरून पुढे.....

### मॅडम, अन्याय होतोय, चूक....

पूर्वकल्पना दिली. त्यांनीही होकार दिला. त्यानंतर १० सप्टेंबर रोजी सकाळीच सीईओ पाटील यांनी तलवाड्यात भेट दिली. यावेळी कोणीच हजर नव्हते. परंतु काहीवेळाने सर्वजण आले. यात पाटील यांनी राऊत यांना कसलीही नोटीस न देता कारवाई करण्याच्या हालचाली सुरू केल्या विशेष म्हणजे निलंबन करण्यापर्यंत हे प्रकरण गेले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार राऊत यांच्या निलंबनाच्या फाईलवर पाटील यांनी वाक्षरीही केली आहे.

याच कारवाईच्या विरोधात फार्मासिस्ट संघटना आक्रमक झाली आहे. त्यांनी कारवाई मागे घेण्यासाठी बुधवारी दुपारी सीईओ पाटील यांच्याकडे धाव घेतली. परंतु एवढा जमाव पाहून सीईओ निघून गेल्या,अखेर संघटनांनी ६ वाजेपर्यंत त्यांच्या कक्षासमोरच उभा राहून संताप व्यक्त केला. त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ यांनाही दिले आहे. कारवाई झाल्यास संघटनेमार्फत निर्णय घेणार असल्याचेही पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

### गौरी गणपती सजावट स्पर्धेच्या...

मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विजेत्यांना आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. सुप्रसिध्द सिने अभिनेत्री तथा नृत्यांगणा मानसी नाईक हिच्या बहारदार नृत्याचा कार्यक्रमही यावेळी होणार आहे. खेळ पैठणीच्या कार्यक्रमातील प्रथम बक्षिस फ्रिज, द्वितीय बक्षिस टीव्ही, तृतीय बक्षिस ओव्हन, चौथे बक्षिस मिक्सर, पाचवे बक्षिस इस्त्री आणि इतर अकरा विजेत्यांना पैठणी दिली जाणार आहे. या कार्यक्रमात महिलांनी सहभागी होवून बक्षिसे जिंकण्याचे आवाहनही विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

गौरी गणपती सजावट स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम पारितोषिक १५ हजार रुपये रोख, द्वितीय पारितोषिक ११ हजार रुपये रोख, तृतीय ७ हजार रुपये रोख व उत्तेजनार्थ दोन पारितोषिके प्रत्येकी ३ हजार रुपये प्रमाणे दिली जाणार आहेत. शहर आणि ग्रामीण अशा दोन गटांत एकुण दहा विजेत्या स्पर्धकांना या रोख रक्कमेसह सन्मानचिन्ह देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत हजारो स्पर्धकांनी सहभाग नोंदवत मोठा प्रतिसाद दिला. ड.सुभाष निकम यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.राजेंद्र बरकसे, शाहीर विलास सोनवणे, प्रशांत रुईकर, विष्णूप्रसाद खेत्रे आणि प्रा.शरद सदाफुले यांनी परिक्षण केले आहे. या स्पर्धेतील महिलांचा सहभाग लक्षात घेवून नारी शक्तिचा सन्मान करण्यासाठी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या केवळ महिलासाठीच्या कार्यक्रमाचे भव्य आयोजन गेवराईत करण्यात आले असून माता भगिनींनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

### वसंतराव काळे व संभाजी राजे...

नसल्यामुळे समाजाच्या विविध मागण्यासाठी स्व. अण्णासाहेब पाटील यांनी स्वतःचे बलिदान दिले. समाजातील तळागळातील लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी अहोरात्र कार्य केले. या त्यांच्या कार्याला प्रेरणा म्हणून त्यांच्या नावाने आपण संस्था स्थापन केली. या संस्थेचे महाविद्यालय सुरू करून आज बीड शहरातील आणि ग्रामीण भागातील कष्टकरी,कामगार, गोरगरीब शेतकर्यांचे हजारो विद्यार्थी या महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षण घेत आहेत. स्व. अण्णासाहेब पाटील यांना अभिप्रेत असणारे कार्य आमची संस्था नेहमी करत राहिल असेही पोकळे म्हणाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बापूसाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि शेवटी आभार प्रा. शिवशंकर पटवारी यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा.सुहास गाढवे, प्रा. राजश्री महाजन, प्रा. शेख, महेश नेवडे, दीपक जाधव, इम्रान पठाण, सचिन चौरे, रसिका पाटील, प्रिती खडके,सौ. संध्या खोसे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र...

आणि अन्य स्वच्छता सवयी अंगीकारुन स्वच्छताविषयक सवयीमध्ये वर्तनबदल घडुन आणण्यासाठी विविध दैनिक उपक्रम राबविले जावेत अस्वच्छ हातांमुळे अनेक रोगांना आमंत्रण मिळते म्हणून स्वच्छ हातासाठी विद्यार्थ्यांना हात धुण्याचे महत्व व हात धुण्याच्या विविध पद्धती समजावून सांगण्यात आल्या. महात्मा गांधीजीच्या, पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदींजीच्या स्वप्नातील स्वच्छ भारत नक्कीच साकार होणार आहे.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.देवकर अशोक, प्रा.बाळासाहे गावडे, प्रा.गायकवाड अच्युत, प्रा.सानप चांगदेव सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने स्वच्छता करण्यासाठी सहभागी झाले होते

## पान १ वरून पुढे.....

### विधानसभेसाठी भाजपचा...

भाजप जितक्या कमी जागा लढेल, तेवढा मित्रपक्षांचा फायदा असं एकंदरीत गणित आहे. सध्या शिंदे गट आणि दादा गटाचे मिळून एकूण ९४ आमदार आहेत. यामध्ये इतर पक्षातील पाठिंबा दिलेले आमदार आणि अपक्षांची पण गोळाबेरीज आहे. आता १३३ जागांमधून ९४ जागा जाता ३९ जागांवर मित्रपक्षांना जागा वाटपाचे सूत्र ठरवावे लागेल. शिंदे, फडणवीस आणि अजितदादा यांच्यात बैठक होऊन यावर तोडगा काढण्यात येईल. मित्र पक्षांपैकी दादा गट आणि शिंदे गट किती जागा लढणार हे ठरले नाही. निवडून येण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. लोकसभेतील उणीवा दूर करून अधिकाधिक जागा निवडून आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

### श्रेयवादासाठी शहरातील ...

नालीबांधकाम करण्यासाठी एकूण १७ कामे प्रस्तावित होती. यामधीलच एक प्रस्तावि असलेल्या रस्त्यापैकी जालना रोड ते अमरधाम स्मशानभूमी (बिंदुसरा नदीवरील) पर्यंत रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याच्या कामास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत मंजुरी मिळून येत्या ८ ते १० दिवसात मा.पालकमंत्र्यांच्या हस्ते या कामाचे उद्घाटन होऊन सुरुवात होणार असल्याचे समजले आहे. परंतु या १७ कामांपैकी बीड शहरात सध्यस्थीतीला अत्यावश्यक असलेल्या गावठाणमधील धोंडीपुरा येथील बलभीम चौक-माळीवेस चौक-राजुरी वेस येथील पोस्ट ऑफिस-कबाड गल्ली वेस-माळीवेस पोलीस चौकी पर्यंतचा रस्ता, तसेच राजुरी वेस येथील बलभीम चौक-माळीवेस चांदणी चौकापर्यंत व अजिजपूर येथील नुरी मस्जिद ते कागदी वेस येथील पोस्ट ऑफिस-कबाडगल्ली वेस-माळीवेस पोलीस चौकीपर्यंत सिमेंट काँक्रीट रस्स्त्याची अक्षरश: चाळणी झाली आहे. ही बाब लक्षात घेवून आ.संदीप क्षीरसागर दि.१२ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक घेवून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) नगर परिषद अंतर्गत टप्पा क्र.२ मधील बचत खर्चातुन सदरील कामे करण्याचे मागणी केली होती. यावर मा.जिल्हाधिकारी यांनी मा.मुख्याधिकारी यांना रितसर प्रस्ताव दाखल करण्याचे सुचविले होते. यावर मा.मुख्याधिकारी यांनी दि.२६.०८.२०२४ रोजी मा.जिल्हा सह आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव दाखल केला. परंतु पालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी यांना सांगुन सदरील प्रस्ताव प्रलंबित ठेवला व या कामांची मंजुरी अडवली. अशा प्रकारे बीड शहरातील अत्यावश्यक असलेल्या कामांमध्ये खोडा आणला. जालना रोड ते अमरधामपर्यंतच्या रस्त्याला तातडीने मंजुरी मिळाली याचे खरोखरच समाधान आहे. कारण हा रस्ता करणे खुप आवश्यक होते. परंतु या सोबतच आ.संदिप क्षीरसागर यांनी मागणी केलेले रस्तेही आवश्यकच आहेत. मग केवळ श्रेयवादासाठीच लोकांसाठी आवश्यक असलेली कामे अडवुण बीड शहरातील विकास कामामध्ये पालकमंत्र्यांनी अन्यायकारक भेदभाव करू नये असे न.प.चे माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष खुर्शिद आलम यांनी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

### लिंबागणेश येथे शेतकऱ्यांच्या ...

कारभारामुळे शेतकरी त्रस्त असुन रिक्त अभियंता महावितरण पद भरण्यात यावे आदी.मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२६ सप्टेंबर गुरुवार रोजी सकाळी अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील शिवतीर्थ लिंबागणेश येथे चक्काजाम आंदोलन करण्यात आले.यावेळी बैलगाड्यांसह शेतकरी माताभगिणी आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. रास्तारोको मुळे वाहनांची लांबलचक रांग लागलेली दिसुन आली. सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, मुळुकवाडीचे माजी सरपंच कृष्णा पितळे, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, शिवशक्ती भिम शक्ती विचार मंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, किसान सभेचे सुनिल भोसले, महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांची समायोजित भाषणे झाली.मागण्यांचे निवेदन - महसूल विभागाचे मंडळ अधिकारी अशोक डरपे, तलाठी गणपत पोतदार,कृषी विभागाचे संतोष काशिद कृषी पर्यवेक्षक, आनंद वाघ, रामेश्वर पेजगुडे कृषी सहाय्यक, महाराष्ट्र ग्रामीण बँक लिंबागणेश सहाय्यक शाखाधिकारी प्रीती मेनघरे, पोलिस प्रशासनाचे अंमलदार संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे ,उद्धव तांबे यांनी निवेदन स्वीकारले.यावेळी माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, सरपंच बाळासाहेब जाधव,विक्की वाणी, बाळासाहेब मुळे, अक्षय वाणी, अशोक जाधव, संतोष भोसले, प्रवीण मुळे,पोखरी सरपंच बिभिषण मुळीक , पिंपरनई सरपंच बाळासाहेब वायभट सोमनाथ वाडी सरपंच किशोर जाधव,रेवन येडे, फुलचंद येडे,बाळसिंह परदेशी,संतोष भोसले, तुकाराम गायकवाड अशोक जाधव, आरूण ढवळे, गणेश येडे ,शाकींदर काटकर,खंडु ढास, जनार्दन मांडवे, महादेव वायभट , कैलास निर्मळ, सर्जेराव घरत लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकरी बांधव व महिला भगिनींची उपस्थिती होती.

### २५ टक्के अग्रीम पिक विमा तातडीने देण्यात यावा

सप्टेंबर मध्ये बीड जिल्ह्यातील ६१ महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. खरीप हंगामात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीकडून २५ टक्के अग्रीम विमा रक्कम तातडीने दिली जाईल असे आश्वासन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुख्य ध्वजारोहण सोहळ्याप्रसंगी दिले होते.मात्र याबाबत अद्यापही संथ गतीने काम सुरू असुन शेतकऱ्यांमध्ये नाराजी असुन युद्ध पातळीवर काम करून तातडीने अग्रीम पीक विमा रक्कम देण्यात यावी.

### थकीत पीक कर्जामुळे शेतकऱ्यांच्या बचत खात्यावरील होल्ड काढण्यात यावा

शेतकऱ्यांच्या थकीत पीक कर्जामुळे राष्ट्रीयकृत बँकांनी बचत खात्याला होल्ड लावल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.शेतक-यांना शेतीच्या कामासाठी खते,बी बियाणे खरेदीसाठी दरवर्षी पीक कर्ज घ्यावे लागते.खरीप हंगामात घेतलेल्या पीक कर्जाची शेतकरी उत्पन्नातुन परतफेड करत असतात.प्रत्येक हंगामात दुष्काळ, अतिवृष्टी अशी संकटे शेतकऱ्यांसमोर उभी राहतात त्यामुळे शेतकरी पीक कर्जाची परतफेड वेळेवर करू शकत नाहीत.त्यातच बँकांनी पीक कर्जापायी शेतकऱ्यांच्या बचत खात्याला होल्ड लावण्यात आलेला आहे.शेतक-यांकडे येणाऱ्या रोजगार, पीक विमा, अनुदान, नुकसान भरपाई याची रक्कम डीबीटी द्वारे बचत खात्यावर जमा होत असुन बचत खात्याला होल्ड लावल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आला असुन खात्यावरील होल्ड काढण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी बँक व्यावस्थापनाला देण्यात यावेत. अशी मागणी करण्यात आली.

### योगेश भैय्या बीड शहराची चाळणी....

करण्याचे काम क्षीरसागरांनी केले आहे. शहरातील मोठ्या प्रमाणात रस्ते आजही खड्डेमय आहेत. शहरातील रस्त्यांची वाट लागण्यासाठी अधिकारी, नागरिक जबाबदार नसून . केवळ क्षीरसागरांमुळे आज शहराची चाळणी झाली असून याचे खापर सर्वसामान्य बीडकरांवर फोडले जात आहे. शहरातील जनतेनेचे ३० वर्षांहून अधिक काळ नगर पालिका क्षीरसागरांच्या एक हाती दिली. मात्र क्षीरसागरांनी जनतेचे उपकार फेडण्याऐवजी एकमेकांच्या राजकीय स्वार्थासाठी शहरात समस्यांचा डोंगर उभा करुन नागिरकांना वेठीस धरण्याचे पाप केले आहे असेही शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी म्हटले आहे.

### खोटे धनगर प्रमाणपत्र रद्द करून...

महाराष्ट्रामध्ये एकही धनगड अस्तित्वात नसताना संभाजीनगर जिल्ह्यामध्ये काही चुकीची खोटी धनगड प्रमाणपत्र देऊन धनगर बांधवांच्या मूळ प्रश्नाला बदल देण्याचे काम या राज्यामध्ये झाले आहे मुळता ते कुटुंब धनगर समाजाचेच असून त्यांचे सर्व नातेवाईक हे धनगर बांधवच आहेत त्यांच्या रूढी परंपरा चालीरीती धर्म संकल्पना या धनगर बांधवांच्याच आहेत त्यामुळे त्यांनी ही आमची प्रमाणपत्रे रद्द करण्यासाठी न्यायालयाकडे तसे शपथपत्र सादर केलेले आहेत तरीही संबंधित विभागाचे अधिकारी हे प्रमाणपत्रे रद्द करण्यासाठी टाळाटाळ करत आहेत तसेच धनगर बांधवांना आरेवारीची भाषा करत आहेत त्यामुळे या प्रमाणपत्राची सत्याचा नसल्याने ही सर्व ग्रामपंचायत रद्द करून सकल धनगर बांधवांच्या एसटी आरक्षण अंमलबजावणी साठीचा जीआर राज्य सरकारने तात्काळ काढावा येणाऱ्या निवडणुका लागण्या अगोदर सरकारने या समाजाला न्याय देण्याची भूमिका निभवावी अशी मागणी महाराष्ट्रातील सकल धनगर जमातीच्या माध्यमातून होत आहे.

### महाराष्ट्रात लवकरच विधानसभा...

क्षीरसागर उपस्थित होते. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या या शिष्टमंडळात वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त धर्मेंद्र शर्मा, वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त नितेश व्यास, वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त मनीश गर्ग, उपनिवडणूक आयुक्त हिर्देश कुमार, उपनिवडणूक आयुक्त अजित कुमार, उपनिवडणूक आयुक्त मनोजकुमार साहू, उपनिवडणूक आयुक्त संजय कुमार, उपनिवडणूक आयुक्त त्याचबरोबर आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समावेश आहे. २७ ते २८ सप्टेंबर या दोन दिवसीय भेटी दरम्यान केंद्रीय निवडणूक आयोगाचे अधिकारी हे राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, मुख्य निवडणूक अधिकारी, मुख्य सचिव यांच्यासह राज्यातील विविध अंमलबजावणी अधिकारी यांच्यासोबत आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक घेणार आहेत. यानंतर निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेऊन निवडणुकीची घोषणा करण्याची शक्यता आहे.

### कर्णकर्कश सायलंसर वर बीड...

त्यांच्याकडून १ लाख ३० हजार २०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. या कारवाई मुळे वाहनधारकांना चांगलाच चाप बसणार आहे. बीड वाहतूक पोलीस शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप, पीएसआय हनुमान घोडके, पीएसआय पवार, वाहतूक पोलीस बजरंग ठोंबरे, नारायण दराडे, नितीन काकडे, आर टी पवार, आदिनाथ मुंडे, वसीम शेख, अरुण राऊत, त्रिंबक फड , एलपीसी गायकवाड, बाळासाहेब पारवे, मधुकर रोडे, राधा काळे, दिपाली बोंडले या वाहतूक पोलिसांनी संयुक्त मोहीम राबविली.

## जाहीर प्रगटन

तमाम लोकांस विशेषतः करचुंडी ते मांजरसुंबा रस्ता परिसरातील लोकांस जाहीर आवाहन करणेत येते की, आमचे अशिल **श्री. आजिनाथ कोंडीबा शिंदे रा. करचुंडी, पो. मांजरसुंबा, ता. जि. बीड** मो.नं. ८८३०८६६७१३ हे दिनांक. २५/०९/२०२४ रोजी सकाळी आठ वाजता करचुंडी ते मांजरसुंबा मोटार सायकल वरून जात असताना स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा शिवाजीनगर, बीड खाते क्रं. ३३३९५१२२९८९, कॅनरा बँक शाखा पाली, बीड खाते क्रं. ३७७३११८०००००६ व बँक ऑफ महाराष्ट्र शाखा नगर रोड, बीड खाते क्रं. ६०१८४९६१९८७ चे सहया केलेले चेकबुक व काही महत्वाची कागदपत्रे कॅरीबॅगसह गहाळ झालेले आहेत. सदर वर नमुद केलेल्या बँकेचे सहया केलेले चेकबुक व काही महत्वाची कागदपत्राचा आमचे अशिलांनी बराच शोध घेतला परंतु ते सापडलेले नाही. त्यामुळे आमचे अशिलांनी दिनांक २५/०९/२०२४ रोजी गृह पोलीस स्टेशन, बीड यांचेकडे रितसर तक्रार दिली असून त्याचा मिसींग रिर्पोट नं. DIS / HOMD / BEED/2024 / 119 असा आहे. तरी आपणांस विनंती की, सबब आमचे अशिलांचा गहाळ झालेले वर नमुद केलेल्या बँकेचे सहया केलेले चेकबुक व काही महत्वाची कागदपत्र कोणास आढळल्यास किंवा सापडल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात** दिवसाच्या आत वर नमुद संबधीत पोलीस स्टेशन मध्ये जमा करावा अगर त्यांनी खालील नमुद पत्यावर आणून द्यावा अगर खालील नमुद केलेल्या मोबाईल नंबर वर ताबडतोब संपर्क करुन तसे कळविण्यात यावे ही नम्र विनंती.

**ठिकाण : बीड**
**दिनांक : २६/०९/२०२४**

(स्वाक्षरीत)
**ॲड. राम ज. दहिवाळ**
(ॲडव्होकेट व नोटरी)
(ऑफिस : दहिवाळ निवास, सुभाष कॉलनी, पेठ बीड पोलीस स्टेशन समोर, बीड )
मो. नं. ९४०४१३०३७७

# मोफत आरोग्य शिबिरातून हजारो रुग्णांना लाभ : डॉ.योगेश क्षीरसागर

**● खालापुरीत आरोग्य शिबिरात १ हजार १८६ रुग्णांची तपासणी**

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघात गटनिहाय मोफत आरोग्य शिबिर घेतले जाते असून याचा हजारो रुग्णांना लाभ मिळाला आहे. यापुढेही आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करू, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

शिरुर कासार तालुक्यातील खालापुरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने मोफत आरोग्य शिबिर गुरुवारी (दि.२६) पार पडले. यात १ हजार १८६ रुग्णांची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. उद्घाटक म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, ग्रामीण

भागात आजही आरोग्य सुविधांची कमतरता आहे. माझ्यासह डॉ. सारिका या आरोग्य क्षेत्रात कार्यरत असल्याने आम्हाला त्याची जाणीव आहे. आपल्या भागातील गरजू रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शिबिराचे आयोजन केले आहे, याचा रुग्णांना मोठ्या प्रमाणावर लाभ होईल. तपासणीनंतर गरजू रुग्णांवर हृदयाची अँजिओग्राफी, कॅन्सर, मणका,आदी शस्त्रक्रिया

**५१२ रुग्णांना मोफत चष्मे वाटप**

**खालापुरीसह परिसरातील १ हजार १८६ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यातील ५१२ रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच, १३५ जणांची रक्त तपासणी, ७२ जणांची मोफत ईसीजी तपासणी केली. याच शिबिरात ११ जणांनी रक्तदान केले.**

सर्व सोयीसुविधायुक्त नामांकित रुग्णालयात मोफत करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी माजी सरपंच दिगांबर गवळी, बाळासाहेब भस्मारे, कृष्णा परजणे, बालाजी गित्ते, अशोक इंगळे, केशव नागरगोजे, भारत भांगे, माऊली परजणे, साईनाथ मिसाळ, रवी सोनवणे, अनिकेत सानप, मिलन उगले, शोभाताई सरवदे यांच्यासह रुग्ण, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### विधानसभा निवडणूक पूर्वतयारी अधिकाऱ्यांची कार्यशाळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहाय्यक निवडणूक अधिकारी यांनी काम करताना सर्व नियम आणि कायद्यातील तरतुदी याची माहिती घेऊन काम करावे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश पाठक यांनी केले. येथील जिल्हाधिकारी कार्यालयात या अधिका-यांसाठी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे तसेच जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी यांची उपस्थिती होती. भारत निवडणूक आयोगाचे अधिकारी मुंबई येथे राज्याचा आढावा घेणार आहे त्यांच्या २ दिवसीय दौ-यानंतर राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या कार्यक्रमाची शक्यता आहे. सर्व निवडणूक कार्यक्रम तयारीसाठी कमी वेळ मिळणार असल्याने सर्वांनी पूर्वतयारी ठेवण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. संदर्भिकेचे विमोचन- जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निवडणूक विभागातर्फे निवडणूक कामकाजासाठी संबंधित सर्व अधिका-यांचे दूरध्वनी क्रमांक व इतर माहिती असणा-या एका संदर्भ पुस्तिकेची निर्मिती करण्यात आली आहे. या संदर्भिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. निवडणूक कामकाजाशी संबंधित क्रमांक तसेच ई- मेल आयडी यासह अनुषंगिक माहिती यात देण्यात आली आहे.

### करणी केल्याच्या संशयातून भोरमध्ये एका व्यक्तीची हत्या

**भोर । प्रतिनिधी**

पुण्यातील भोरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. यामध्ये करणी केल्याच्या संशयातून एका व्यक्तीची हत्या करण्यात आली आहे. गणपत गेनबा खुटवड असं मृत व्यक्तीचं नाव आहे तर स्वप्निल खुटवड असे आरोपीचे नाव आहे. नेहमीप्रमाणे गणपत गेनबा खुटवड ही व्यक्ती रविवार दि. २२ सप्टेंबरच्या रात्री नसरापूर येथून आपल्या घरी यायला निघाला. रात्रीची वेळ होती. पुढे जाऊन आपल्या बरोबर एक भयानक प्रसंग घडणार असून आपल्यासाठी ही काळ रात्र ठरणार आहे, याची त्यांना पुसटशी कल्पनाही नव्हती. गणपत खुटवड हे दुचाकीवरून हातवे बु. येथील गुंजवणी नदीच्या बंधाऱ्यावरील पुलाजवळ पोहोचले आणि त्यांनी अखेरचा श्वास घेतला. यावेळी त्याठिकाणी नक्की काय घडले ? कशामुळे घडले ? याबाबत कोणालाही कसलीच माहिती नव्हती. यादरम्यान त्याच रविवारच्या रात्री साडे अकराच्या सुमारास त्यांचे पुतणे संदीप खुटवड यांना फोन आला की, मयत गणपत खुटवड यांची मोटारसायकल ही हातवे बु. येथील बंधाऱ्याच्या सुरक्षा कठड्याला लटकताना दिसत आहे. त्यानंतर संदीप खुटवड यांनी नातेवाईक व गावातील काही ग्रामस्थांसह घटनास्थळी पोहोचले. तिथे त्यांना गणपत खुटवड यांचा मृतदेह बंधाऱ्याच्या खालच्या बाजुस नदी पात्रात आढळून आला. यावेळी त्यांच्या डोक्यास मार लागून त्यामधून रक्त येत असल्याचे दिसून येत होते.

### स्वराज्य शक्ती सेना या पक्षाच्या आष्टी तालुकाध्यक्ष पदी सय्यद मुबीन यांची निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

सौ. करुणा धनंजय मुंडे यांच्या प्रखर राष्ट्रभक्तीच्या विचारधारेने शिक्षीत होऊन, भारत देशात नव्याने स्वराज्य घडवण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी स्वराज्य शक्ती सेना या पक्षाच्या आष्टी तालुकाध्यक्ष पदी सय्यद मुबीन यांची निवड करण्यात आली आहे नियुक्ती पत्रात म्हटले आहे की स्वराज्य शक्ती सेना या पक्षाची घटना व नियम यांचे तंतोतंत पालन करावे. तसेच स्वराज्य शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ . करुणा धनंजय मुंडे यांच्या सर्व आदेशाची अंमलबजावणी करावी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपण स्वराज्य शक्ती सेनेचे कार्य संपूर्ण भारत देशात न्यावे. समाजातील दिनदलीत, गरीब, मागासवर्गीय, आदिवासी व सर्व जाती धर्माच्या लोकांना न्याय मिळवून देण्याचे कार्य आपण करावे, भ्रष्ट प्रशासनाच्या विरुध्द आपण लोकशाही मार्गाने लढा द्यावा. आपण परमपुज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल्या भारत देशाच्या संविधानाचं व संविधानातील प्रास्ताविकेतील दिलेल्या शपथेचे पालन करावे. आपण जात पात धर्म भेद मानू नयेः धर्मनिरपेक्ष राजनिती करावी. आपण बीड जिल्हयामध्ये स्वराज्य शक्ती सेना या पक्षाचे सदस्य नोंदणी अभियान राबवावे व जिल्हयात - ठिकाणी पक्ष वाढवण्यासाठी कार्य सुरू करावे. असे नियुक्ती पत्रात नमूद करण्यात आले आहे. सय्यद मुबीन यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनदन महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक शेख अमर , महाराष्ट्र बांधकाम मजुर संघटना जिल्हा सरचिटणीस शेख महेबुब,पठाण सलमान (युवा उद्योजक),पठान खालेद अध्यक्ष महाराष्ट्र मुस्लिम विकास परीषद,पठाण साजेद (युवा उद्योजक) ,राजु पठाण (युवा उद्योजक), स्वराज्य शक्ति सेना चे जिल्हा अध्यक्ष सोमनाथ सोनटक्के,श्रृंगेरी बायो एनर्जी कंपनी ब्रम्हगाव चे अमर राजे निंबाळकर( युवा उद्योजक), शेख यासीन (युवा उद्योजक),शेख तोसीफ(युवा उद्योजक),शेख सोहेल,शेख जाफर, शेख इसाक,शेख सिराज यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## सेवानिवृत्त शिक्षक कवि मधूकर बरके यांचे मनोबल काव्यसंग्रहाचे उत्साहात प्रकाशन

**परिसराचा खोलात जाऊन इतिहास सांगणारा काव्यसंग्रह : साहित्यिक प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे**

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर शहर हे ऐतीहासीक शहर आहे काही खुणा शहराचे इतिहासाची ओळख करून देतात या पुढची शहराची ओळख शहरातील जेष्ठ कवी मधुकर बरके यांचा काव्यसंग्रह मनोबल करून देत असून खोलात जाऊन शहराची ओळख करून देतोय असे प्रतिपादन गझलकार, साहित्यीक व कवी प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी मनोबल या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रसंगी बोलताना केले.

धारूर येथील सेवानिवृत्त शिक्षक कवी मधूकर बरके यांनी लिहलेला मनोबल हा काव्यसंग्रह चा प्रकाशन सोहळा राजमाता जिजाऊ महाविदयालयाचे सभागृहात आयोजीत करण्यात आला होता. या प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे हे होते तर प्रकाशन साहित्यिक कवी प्रा. डॉ. मुकुद राजपंखे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी कवियत्री सिमाताई गुंड्र, उपप्राचार्य एम एन गायकवाड, एस टि आगाराचे आगारप्रमुख नवनाथ चौरे, पत्रकार अनिल महाजन,ड. कुंदन शुक्ला, कवी मधूकर बरके हे उपस्थीत होते. यावेळी प्रथम काव्यसग्रहाचे प्रकाशन प्रा. मुकुंद राजपंखे व उपस्थीत मान्यवराचे हस्ते करण्यात आले. कवि मधूकर बरके यानी आपण अनेक चळवळीत काम केले चांगल्या घटना व्यक्तीवर कविता करणे हा माझा छंद होता काव्यसंग्रह प्रकाशित करताना अनेक अडचणी आल्या पण जिद्दीने आपण ते केले लवकर आणखी एक

काव्यसग्रह प्रकाशित करण्याचा मनोदय व्यक्त केला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य गोपाळ काकडे यांनी केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा राम लोखंडे यांनी केले. हा प्रकाशन सोहळा यशस्वी करण्या साठी विनोद बरके व राजेंद्र बरके यांनी परिश्रम घेतले.

## जायकवाडी धरणाचे १८ दरवाजे तीन फुटाने उघडले, दगडी पूल पाण्याखाली गेला

**पैठण । प्रतिनिधी**

जायकवाडी धरणाचीपाणीपातळी ९९.३९ टक्क्यावर पोहचली आहे. दरम्यान, जायकवाडी धरणक्षेत्र आणि धरणावरील परिसरात बुधवार रोजी रात्री मुसळधार पाऊस झाल्याने आवक मोठयाप्रमाणावर वाढली आहे.

यामुळे एक दिवसांपूर्वी एक फुट उंचीने उघडलेली जायकवाडी धरणाची २७ पैकी १८ दरवाजे तीन फुट उंच उघडून विसर्ग वाढविण्यात आला आहे. सध्या गोदावरीच्या पात्रात ५७ हजार ९२ क्युसेक विसर्ग धरणातून सुरू असून आवक लक्षात घेता आपत्कालीन दरवाजेही उघडण्याची शक्यता आहे. बुधवार रात्रीपासून जायकवाडी धरणात पाण्याची आवक ४४ हजार ७५२ क्युसेक वेगाने येत आहे. आवक वाढल्यामुळे पाटबंधारे विभागाने १ फुटावरील असलेले दरवाजे गुरुवारी तीन फूट उंच उघडून विसर्ग वाढविला. धरणाच्या बाजूला असलेल्या दगडी पुलावरून पाणी वाहत आहे. तसेच नाथ मंदिराच्या परिसरातील दशक्रिया घाटाच्या पायऱ्या पाण्याखाली गेल्या आहेत. धरणात येणारी आवक लक्षात घेता आणखीही विसर्ग वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जायकवाडी धरणाकडे जाणाऱ्या मार्गावर बॅरिकेटिंग केली आहे. विसर्ग बघण्यास आलेल्या नागरिकांना अलीकडेच थांबविण्यात येत असून धरणाकडे चालत पाठवले जात आहे.

*आपल्या विविध मागण्यांसाठी शिक्षकांनी पुकारलेल्या एक दिवसीय सामुदायिक रजेने सर्व शाळा बंद झाल्याने आज शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला आहे. १० पटाच्या आतील शाळा बंद न करण्याचा,सरसकट सर्वांना जुनी पेन्शन लागू करण्याचा निर्णय याबरोबर आणखी आपल्या मागण्यांसाठी आज शिक्षकांनी सामुदायिक रजा टाकून आंदोलन केले. खालापूर तालुक्यात एकूण १६७ शाळा असून ३६५ शिक्षकां पैकी ३२५ शिक्षक सामुदायिक रजेवर गेले होते. शिक्षक सेवक म्हणुन कार्यरत असलेले १७ शिक्षक आणि ७ केन्द्र प्रमुख सामुदायिक रजेवर गेले नाहीत. ते ज्या शाळेवर होते, त्या शाळा उघडण्याचा प्रयत्न केला होता, पण विद्यार्थी यांची गैरहजेरी होती.हे आंदोलन सर्व शिक्षक संघटनांचे होते,त्यामुळे शिक्षकांच्या मागण्या शासन नक्की विचारात घेईल व न्याय देईल अशी अपेक्षा व्यक्त करायला हरकत नाही.अन्यथा सर्वानुमते जे ठरेल त्याप्रमाणे पुढे लढा सुरू ठेऊ,असे सुभाष राठोड,उपाध्यक्ष रायगड जिल्हा महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना यांनी प्रस्तुत प्रतिनिधी यांच्याशी बोलताना सांगितले.*

## शेवगांव मार्केट कमिटीच्या हमालांनी केले हसनापूरच्या ढाकणे या शेतकऱ्याचे भुसार मालात आलेले साडेतीन तोळे सोने परत गावकऱ्यांनी आणि मार्केट कमिटीच्या सचिवांनी केला सन्मान

**शेवगांव । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आडत दुकानदार श्री राम सारडा यांच्या दुकानात हसनापूर ता शेवगांव येथील शेतकरी श्री गोरक्ष बाजीराव ढाकणे यांच्या मालकीच साडेतीन तोळे सोने अंदाजे किंमत दोन लाख पन्नास हजार तुपये किमतीचे सोने भुसार माल विक्रीसाठी घेऊन आला त्यात सोन्याचे दागिने असलेली पिशवी आली मालाची साफसफाई करत असताना हमाल मापाडीचे वरुर गावातील हमाल कामगार श्री. जालिंदर रेवडकर

श्री. नवनाथ लव्हाट श्री. सचिन म्हस्के श्री. गणेश म्हस्के श्री. गणेश इथापे यांनी मार्केट मध्ये आलेल्या संबंधित शेतकरी बांधव यांचे सोने एका गोणीत सोने आल्याचे आढळून आलें त्या कामगारांनी ते सोने इमानदारीने मार्केट कमिटीचे सचिव श्री अविनाश म्हस्के यांच्याकडे दुकानदार श्री राम सारडा यांच्या मार्फत जमा केले असता

**● आज कालच्या जमण्यात १० रुपयांची नोट सापडली तर इकडे तिकडे पाहून खिशात घालणारे महाभाग आपण पाहतो पन वर्षभर काबाडकष्ट करून हमाली करण्याबरोबरच आपली इमानदारी जपणारे मजुर दुर्मिळच.**

त्या हसनापूरच्या शेतकरताने गावकर्यांनी त्यांचा यथोचित सन्मान केला व मार्केट कमिटी कार्यालयात पुरुषोत्तम बिहणी राम सारडा व व्यापाऱ्यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

## महाराष्ट्र राज्य, मराठवाडा विभाग, संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष पदाच्या निवडी जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकारांचा बुलंद आवाज म्हणून ओळख असणाऱ्या लोकशाही पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष शिक्षण विकास समिती सुनील किसन वाघमारे, मराठवाडा अध्यक्ष सामाजिक कार्य विकास समिती राजकुमार रामराव कांबळे, संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष शिक्षण विकास समिती पिरखा दिलावर पठाण, किरण सचिन दोंदे संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष महिला बचत गट विकास समिती,संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे, संभाजीनगर जिल्हा सचिव महिला बचत गट विकास समिती किरण ढवळनपुरे पदी लोकशाही पत्रकार संघाच्या निवडी संघाचे संस्थापक अध्यक्ष बी.बी वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, प्रदेश अध्यक्ष माणिक वाघमारे, प्रदेश अध्यक्ष महिला आघाडी निलोफर शेख, प्रदेश उपाध्यक्ष साजेद सय्यद, मराठवाडा अध्यक्ष वसीम आजाद, प्रभाकर पांडे,मराठवाड्याचे उपाध्यक्ष दत्तात्रय नरनाळे, संभाजीनगर पूर्व जिल्हा अध्यक्ष अनिस कुरेशी, पश्चिम जिल्हा अध्यक्ष सिद्धार्थ नेतने यांनी केली. त्यानंतर लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य , प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी शेख, बीड जिल्ह्याचे अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, पाश्चिम बीड जिल्हा अध्यक्ष बिलाल शेख, महिला बचत गटाच्या बीड जिल्हा अध्यक्षा सौ. संजीवनी खोगरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

राज्यभरात लोकशाही पत्रकार संघामुळे पत्रकारांचे मजबूत संघटन उभारले जात आहे. पत्रकारांना विमा कवच, त्यांच्या पाल्यांचे शिक्षण, घर, नवे तंत्रज्ञान कौशल्य, सेवानिवृत्ती नंतरच्या आयुष्याचे नियोजन या प्रश्नांकडे लोकशाही पत्रकार संघाने लक्ष केंद्रित केले असल्याने राज्यभरातील पत्रकारांचा देखील मोठा प्रतिसाद लोकशाही पत्रकार संघाला मिळत आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असूनही तो अनेक मुलभूत सुविधांपासून वंचित आहे, त्याच्या संरक्षणाचा प्रश्न मागे पडला आहे, तो लोकशाहीचा महत्वाचा घटक असून ही निराधार असल्याचे दिसते आहे. लोकशाहीचे जतन करणे आता लोकशाही पत्रकार संघाचे काम आहे असे मत सुनील वाघमारे यांनी व्यक्त केले. यावेळी प्रदेश, मराठवाडा पातळीवरील महत्त्वाच्या पदावर निवड करत काम करण्याची

संधी दिली म्हणून लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य आणि लोकशाही पत्रकार संघाच्या सर्व टीमचे त्यांनी आभार मानले.

एकंदरीत या निवडीनंतर महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष शिक्षण विकास समिती सुनील किसन वाघमारे, मराठवाडा

**● प्रदेश अध्यक्ष शिक्षण विकास समिती सुनील किसन वाघमारे, मराठवाडा अध्यक्ष सामाजिक कार्य विकास समिती राजकुमार रामराव कांबळे, संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष शिक्षण विकास समिती पिरखा दिलावर पठाण, किरण सचिन दोंदे संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष महिला बचत गट विकास समिती,संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे, संभाजीनगर जिल्हा सचिव महिला बचत गट विकास समिती किरण ढवळनपुरे पदी लोकशाही पत्रकार संघाच्या निवडी जाहीर**

अध्यक्ष सामाजिक कार्य विकास समिती राजकुमार रामराव कांबळे, संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष शिक्षण विकास समिती पिरखा दिलावर पठाण, किरण सचिन दोंदे संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष महिला बचत गट विकास समिती,संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे, संभाजीनगर जिल्हा सचिव महिला बचत गट विकास समिती किरण ढवळनपुरे पदी लोकशाही पत्रकार संघाच्या निवडी झाल्याबद्दल या सहा पदाधिकाऱ्यांवर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या वेळी ॲड. जहीर पठाण बीड जिल्हा वकील संघाचे सहसचिव ॲड. श्रीकांत जाधव सचिव ॲड. यासेर पटेल ॲड. सय्यद साजिद ड. फिरोज उपाध्यक्ष ॲड. अविनाश गडगे, ॲड सिद्धार्थ उजगरे आदीनी . या वेळी उपस्थित सर्वांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या.

जनसामान्यांचे शस्त्र, दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

● शुक्रवार, दि.२७ सप्टेंबर २०२४ ● पान ४

## थोडक्यात

### विजय(आण्णा)गाढवेंच्या नेतृत्वात खड्ड्यांत झाड लावून आंदोलन

**आष्टी । प्रतिनिधी**

रस्त्यांची अवस्था बिकट झालेली आहे. याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग लक्ष देत नसल्याने बीड – अहिल्यानगर रस्त्यावरील धामणगाव येथे युवा नेते विजय(आण्णा )गाढवे यांच्या नेतृत्वात खड्ड्यांत झाड लावून आंदोलन करण्यात आले.सार्वजनिक बांधकाम विभाग बेशरमझालाय काय? असा खडा सवाल धाम णगाव येथिल तरुणांनी केला आहे. नुसता सवाल करून थांबले नाहीत तर त्यांनी खड्या चे पुजन करून झाड लावून सार्वजनिक बांधकाम विभागाचा निषेध केलाय. युवा नेते विजय( आण्णा) गाढवे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी विजय (आण्णा )गाढवे यांच्यासह तरुणांची उपस्थिती होती.

### वैष्णवी महाविद्यालयामध्ये रासेयो अर्तंगत रक्तदान शिबीर संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचालित व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. छत्रपती संभाजी नगर सलग्तीत वैष्णवी महाविद्यालयांमध्ये, वैष्णवी महाविद्यालय ,जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष व खउढउ चिंचवण यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ मंगळवार रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या राष्ट्रीय सेवा योजना अर्तंगत उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांना सहभाग घेतला. यामध्ये एकूण १८ जणानी रक्तदान केले. या शिबीराला बीड येथील शासकीय पेढीतील कर्मचाऱ्यांचे वडवणी येथील शासकिय रुग्रालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. या शिबारा ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शामसुंदर गुळभिले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. मुंजाजी सोंळके , चिंचवणचे ICTC समुपदेशक प्रसाद ठोसर व इतर कर्मचाऱ्यानी सहकार्य केले.

### श्री कंकालेश्वर मंदिर येथे आज पासून संगीतमय शिव महापुराण कथेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील श्री कंकालेश्वर मंदिर येथे दि.२७ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत पितृमोक्ष प्राप्ती करीता संगीतमय शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या शिव महापुराण कथा श्रवणाचा बीड जिल्ह्यातील भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री कंकालेश्वर मंदीराचे पुजारी संजय गुरव परिवार व भाविक-भक्तांच्या वतीने करण्यात आले आहे.

### फार्मासिस्ट संघटना आक्रमक : वैद्यकीय अधिकाऱ्यांना पूर्वकल्पना देऊन गेल्यानंतरही कारवाईच्या हालचाली

# मॅडम, अन्याय होतोय, चूक नसतानाही कारवाई कशासाठी?

**बीड । प्रतिनिधी**

मुलगा आजारी असल्याने त्याला तातडीने अगोदर गेवराई आणि नंतर छत्रपती संभाजीनगरला रेफर केले. त्यामुळे फार्मासिस्टने आपल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना फोनवरून पूर्वकल्पना देत रुग्णालय गाठले. याच दरम्यान प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांनी तलवाडा आरोग्य केंद्राला सकाळी साडेआठ वाजता भेट दिली. यावेळी ते डॉक्टरांसह सर्वच गैरहजर होते; परंतु काही वेळाने हजर झाले. मात्र, फार्मासिस्ट रुग्णालयात असल्याने येऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाईच्या हालचाली पाटील यांनी केल्या आहेत. याविरोधात संघटना आक्रमक झाली असून चूक नसताना कारवाई कशासाठी? असा सवाल उपस्थित करत सीईओंच्या कक्षासमोर जमा झाले.

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रदीप राऊत हे फार्मासिस्ट आहेत. ९ सप्टेंबर रोजी सायंकाळीच त्यांचा ४ वर्षांचा मुलगा अचानक आजारी पडल्याने त्याला घेऊन ते गेवराईला गेले. परंतु ताप अधिक असल्याने त्याला छत्रपती संभाजीनगरला रेफर केले. यावेळी राऊत यांनी हा सर्व प्रकार वैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा शेळके यांना सांगून १० सप्टेंबर रोजीही उशिरा येण्याबाबत ▶▶उर्वरित पान २ वर

#### ▶ वैद्यकीय अधिकाऱ्यांचेही पत्र

वैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा शेळके यांनीही प्रदीप राऊत हे पूर्वकल्पना देऊन गेल्याचे लेखी पत्र सीईओंना दिले आहे. असे असतानाही कसलीही नोटीस किंवा समज न देता थेट निलंबनाच्या कारवाईपर्यंत हालचाली सुरु झाल्या आहेत. या कारवाईसाठी पाटील यांचा हट्ट का, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे.

#### ▶ 'फार्मासिस्ट डे'लाच आंदोलनाची वेळ

२५ सप्टेंबर हा जागतिक फार्मासिस्ट डे म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. बीडमध्येही फार्मासिस्ट संघटनेच्या वतीने बुधवारी दुपारी कार्यक्रम घेण्यात आला. या दिवसाच्या निमित्ताने खरेतर फार्मासिस्टचे स्वागत व्हायला हवे. मात्र चुकीच्या पद्धतीने आपल्या सहकायावर कारवाई होत असल्याने कार्यक्रमासाठी आलेले सर्वच फार्मासिस्ट जिल्हा परिषदेत जाऊन मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांच्या कक्षासमोर जमले. आमच्या सहकाच्यावर चुकीची कारवाई करु नये, अशी मागणी त्यांनी केली.

▶ मुलगा आजारी असल्याने छत्रपती संभाजीनगरला जात असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिली. मुलाच्या उपचाराची सर्व कागदपत्रे आणि त्यावर वेळ देखील आहे. असे असतानाही फार्मासिस्टवर कारवाई करणे चुकीचे आहे. चूक असल्यावर जरूर कारवाई करावी; परंतु चूक नसतानाही असा अन्याय होत असल्याने आम्ही सर्वजण एकत्र आलो. – योगेश जोशी, राज्याध्यक्ष फार्मासिस्ट संघटना



*बीड मौजे ईट येथील ग्रापंचायत सदस्य सचिन नरनाळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, अशोक नाना होकार, शंकर कदम आदी छाया चित्रात दिसत आहेत.*

## गौरी गणपती सजावट स्पर्धेच्या पारितोषिक वितरणानिमित्त रंगणार खेळ पैठणीचा

### माता भगिनींनी उपस्थित राहण्याचे विजयसिंह पंडित यांचे आवाहन

**तलवाडा । प्रतिनिधी**

प्रतिनिधी:- विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून आयोजित केलेल्या गौरी गणपती सजावट स्पर्धेला गेवराई विधानसभा मतदार संघातील महिलांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण सोमवार, दि.३० सप्टेंबर रोजी सकाळी ११३०: वाजता र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. या निमित्ताने होम मिनिस्टर खेळ पैठणीचा आणि सुप्रसिध्द सिनेतारीका मानसी नाईक हिच्या बहारदार नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. केवळ महिलांसाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात सहभागी होवून कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन आयोजक विजयसिंह पंडित यांनी केले आहे. होम मिनिस्टर कार्यक्रमातील विजेत्यांना

आकर्षक बक्षिसे मिळणार आहेत. शारदा प्रतिष्ठान, गेवराई यांच्यावतीने आणि बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदार संघात शहर आणि ग्रामीण भागासाठी दोन टप्प्यात गौरी गणपती सजावट स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरणानिमित्त महाराष्ट्रभर गाजलेले रमेश परळीकर प्रस्तुत होम ▶▶उर्वरित पान २ वर

### स्व. अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांच्या जीवनाला स्थैर्य मिळवून दिले : रमेश पोकळ

## वसंतराव काळे व संभाजी राजे महाविद्यालयात स्व. अण्णासाहेब पाटील यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

समाजातील सर्व जाती धर्मातील कष्टकरी, मजूर, माथाडी कामगारांना एकत्रित करून त्यांच्या न्याय हक्कासाठी स्व. अण्णासाहेब पाटील यांनी चळवळ उभी केली. या चळवळीच्या माध्यमातून माथाडी कामगारांना सेवा, आरोग्य, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी तत्कालीन सरकारला माथाडी कायदा करायला लावून माथाडी कामगाराच्या जीवनाला स्थैर्य मिळवून देण्याचे महान कार्य स्व.

अण्णासाहेब पाटील यांनी केले. असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले आहे.

येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड कम्प्युटर सायन्स आणि संभाजी राजे कॉलेज ऑफ लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स बीड यांच्या संयुक्त विद्यमाने माथाडी कामगार नेते स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमेश भाऊ पोकळे हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बापूसाहेब शिंदे, तेजस शिंदे, हनुमान मुळीक, राहुल वायकर, संस्था सचिव गणेश पोकळे व प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना पोकळे म्हणाले की, समाजातील आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांना शिक्षणात सवलती मिळाव्यात. तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळावे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळावा. माथाडी कामगारांना सेवा, आरोग्य सुविधा,अशा अन्य मागण्या घेऊन मुंबईमध्ये भव्य मोर्चा स्व. अण्णासाहेब पाटील यांनी काढला. परंतु शेतकऱ्यांच्या, विद्यार्थ्यांच्या, माथाडी कामगारांच्या विविध मागण्यांना तत्कालीन असंवेदनशील सरकार सकारात्मक प्रतिसाद देत ▶▶उर्वरित पान २ वर

### बस स्थानक, आगार पाण्याखाली बसचे कामे खोळंबली

## बीड शहराला पावसाने झोडपल्याने काही भागाला आले तळ्याचे स्वरुप

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याला मागील काही दिवसापासून संततधार पाऊस झाला तर काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे.काल दुपारी अचानक जोरदार पावसाची सुरुवात झाल्याने पावसाने बीड शहराला झोडपून काढल्याने बीड शहरातील जालना रोड पाण्याखाली गेला, शाहूनगरकडे जाणारा रस्ता काही काळ बंद झाला, त्या पाण्यात अनेक वाहनधारक व वाहने अडकून पडली होती. या पावसाने बीड बस स्थानकतील आगारांला

तळ्याचे स्वरूप आले. त्यामुळे दुरुस्ती,मेंटेनेससाठी आलेल्या बसला दुरुस्त करण्यासाठी तेथील कामगारांना अडचणी येत असून, काम करण्यासाठी लागणारे साहित्य पाण्यात गेले आहे. त्यामुळे बस आगारातील अनेक बस उभ्या आहेत.

### पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदींजीच्या स्वप्नातील स्वच्छ भारत नक्कीच साकार होणार आहे : डॉ.राहुल टेकाडे

#### भगवान महाविद्यालय व पंडित जवाहरलाल महाविद्यालय यांच्या वतिने स्वच्छता मोहीम

**आष्टी । प्रतिनिधी**

पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदींजीच्या स्वप्नातील स्वच्छ भारत नक्कीच साकार होणार आहे असे प्रतिपादन ग्रामीण रुग्णालय आष्टीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ राहुल टेकाडे यांनी भगवान महाविद्यालय व पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय यांच्या वतिने ग्रामीण रुग्णालय परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली यावेळी ते बोलत होते पुढे बोलतांना डॉ राहुल टेकाडे म्हणाले की

स्वच्छता! शब्द वाचताच मनात सौंदर्य फुलते. स्वच्छतेने मन प्रसन्न रहाते. या स्वच्छतारुपी सौंदर्याची आराधना करण्याची सवय अंगी बाळगण्यास शिकवण्याचे मोलाचे काम महाविद्यालय करते. समृध्द

भारताच्या निर्माणामध्ये पहिले महत्वाचे पाऊल हे स्वच्छतेचे आहे. यासाठी आपण स्वत:बरोबर आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी अंगी बाळगणे महत्वाचे आहे. Cleanliness is next to Godliness या महात्मा गांधीच्या घोषवाक्यानुसार मा.पंतप्रधान श्री. मोदीजींनी स्वच्छतेचे महत्व लक्षात घेऊन 'स्वच्छ भारत अभियानाची' घोषणा केली.

यावर्षी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छ भारत मोहीम पंधरवडा घोषीत करण्यात आला. मोदींनी 'स्वच्छ संकल्प से स्वच्छ सिध्दी' चे आवाहन केले होते. यानुसार भगवान महाविद्यालय व पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय यांनी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली

तसेच वर्षभर विद्यार्थ्यांमध्ये शौचालयाचा वापर, हातधुण्याच्या सवयी ▶▶उर्वरित पान २ वर

## नेकनूर स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.अशोक हुबेकर उंटावर बसून शेळ्या हाकण्यासाठी का?

### वैद्यकीय अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांना जाब विचारणारा कोणी वाली आहे का नाही?

**नेकनूर । प्रतिनिधी**

नेकनूर स्त्री रुग्णालय या ठिकाणी असणारे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक हुबेकर यांचा कर्मचाऱ्यावर कसलाही वचक राहिला नसून वरिष्ठ रुग्णालयात येताच स्वतःची पाठ थोपटून घेण्यात मात्र कुठेही कमी पडत नसताना दिसून येत आहेत.या ठिकाणी असणारे वैद्यकीय अधिकारी, बालरोग तज्ञ, स्त्री रोग तज्ञ, लॅब टेक्निशियन, एक्स-रे टेक्निशियन, सह नर्सिंग स्टाफ यांच्यावर कसलाही वचक राहिला नसल्याने महिलांना योग्य उपचार मिळत नसल्याची ओरडही

महिलांच्या नातेवाइकांकडून वारंवार ऐकायला मिळत आहे. ज्या अपेक्षेने हे रुग्णालय सुरू करण्यात आले ती अपेक्षाच फोल ठरत असल्याचे दिसून येत आहे.

लाखो रुपये रुग्णालयावर शासन खर्च करत आहे मात्र भोंगळ कारभारामुळे संतप्त प्रतिक्रिया रुग्णासह नागरिकाकडून उमटत आहेत. रुग्णालयात रुग्णांना आपल्या आजारपणाचा सामना न करता गैरसोयीचा सामना करावा लागत आहेस्त्री रुग्णालयामध्ये लॅब टेक्निशियन हे असतात की नसतात नागरिकांना व रुग्णांना पडलेला प्रश्न आहे आत्ताच जिल्हा शल्य चिकित्सक यांनी नवीन लॅब टेक्निशियन मशीन नेकनूरच्या रुग्णालयाला उपलब्ध करून दिली असून अद्यापही रक्त लघवी व विविध तपासण्यासाठी रुग्णांना बाहेरच्या खाजगी ठिकाणी जावे लागत आहे जिल्हाशल्य चिकित्सक डॉ.बडे यांनी याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.तसेच रुग्णालयातील एक्स-रे मशीन वारंवार खराब होत असून एक्स-रे काढण्यासाठी टेक्निशियन कर्मचारी गायब असतात अशी चर्चा असून रुग्णांना बीड या ठिकाणी काढा असे सांगितले जात आहे तसेच नर्स स्टाफ हा रुग्णांशी व्यवस्थित न बोलता उद्धट बोलण्यामुळे रुग्णांमध्ये ही नाराजी पसरत आहे तसेच येथील सफाई कामगार हे व्यवस्थित रुग्णालय साफ करीत नसल्याने रुग्णांचा आजार कमी होण्यापेक्षा अधिक होण्याची भीती रुग्णांच्या नातेवाईकांना वाटत आहे या गोष्टीचे रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. हुबेकर यांना काही देणे घेणे नाही डॉ. हुबेकर उंटावर बसून शेळ्या हाकतात का? असा सूर रुग्णांसह नातेवाईकांसह नागरिकांतून निघत आहे.